संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# टेरिफ धोरणातून नवी जागतिक समिकरणे

अमेरिकेच्या टेरिफच्या धमकीनंतर भारताने आंतरराष्ट्रीय पातळीवर सुरू केलेली संपर्क मोहीम एका वेगळ्या स्तरावर पोहचताना दिसते. जपानपाठोपाठ पंतप्रधानांनी तब्बल सात वर्षानंतर चीनलाही भेट दिलेली आहे. जपानच्या भेटीत भारताला अपेक्षित असलेले सहकार्य प्राप्त झालेले दिसते. काही आर्थिक करारांबरोबरच भारतातल्या गुंतवणुकीबाबत जपानकडून भारताला मिळालेले आश्वासन हे अमेरिकेच्या टेरिफ धमकीनंतरचा मोठा सकारात्मक प्रतिसाद ठरतो. अमेरिका आणि चीन यांचे नेहमीच वितुष्ट राहिलेले आहे. परंतु चीनबरोबरही अमेरिकेने स्वतःचे व्यापारी संबंध कायम ठेवलेले आहेत. याचा अर्थ अमेरिका चीनची औद्योगिक किंवा आर्थिक ताकद ओळखून आहे. म्हणूनच भारतासारखा पन्नास टक्के टेरिफ त्यांनी चीनवर लादलेला नाही. परंतु भारतानेसुद्धा चीनबरोबरचा सीमाविभाग सोडवण्याच्यादृष्टीने प्रयत्न केले असताना दोन्ही देशांच्या व्यापारी संबंधांना बळ देऊन आंतरराष्ट्रीय स्तरावर एका नव्या खेळीला प्रारंभ केला आहे. आज जगातील निम्म्यापेक्षा जास्त देशांवर अमेरिकेने टेरिफची दहशत बसवली असली तरी त्याला तितक्याच कौशल्याने परतवून लावण्याचा प्रयत्न जगातले अनेक देश करीत आहेत ज्या पद्धतीने जपान चीन या देशांनी अमेरिकेच्या या टेरिफपुढे झुकायचे नाही असे ठरवून अमेरिकेबरोबरचे व्यापारी किंवा आर्थिक संबंध वेगळ्या पद्धतीने नियंत्रित करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. जगातील अनेक देशांना अमेरिकेची जशी गरज आहे तशीच अमेरिकेला आपली अर्थव्यवस्था टिकवण्याकरीता जगाचीदेखील गरज भासते. टेरिफचा बडगा उगारून अमेरिकेची आर्थिक स्थिती खूप सुधारेल अशी आज परिस्थिती दिसत नाही. काही प्रमाणात जरी अमेरिकेचा फायदा होणार असला तरी भविष्यकाळाचा विचार केला तर अमेरिकेतल्या बऱ्याच मोठ्या उद्योगांचे नुकसान होण्याचीही तितकीच मोठी शक्यता आहे. चीनने ज्या पद्धतीने अमेरिकेशी टेरिफसंदर्भात धोरण ठेवले आहे काहीशा त्याच पद्धतीने भारतदेखील भूमिका घेताना दिसतो. चीनबरोबरचा व्यापार वाढवून दोन्ही देशातील संबंध वाढू शकतात. आणि दोन्ही देशांचा आर्थिक लाभ होऊ शकतो.

### अमेरिकेला शह देण्याचा प्रयत्न

याच दृष्टीकोनातून भारत आणि चीन जर एकत्र आले तर जगासाठी ती एक मोठी आर्थिक शक्ती ठरू शकेल. अशा प्रकारचे मोठे विधान मोदी यांनी केले आहे. या विधानामागचा उद्देश जर लक्षात घेतला तर अमेरिकेला इशारा देणे हा तर भाग त्यातून येतोच. शिवाय आंतरराष्ट्रीय स्तरावर चीन इतकीच मोठी बाजारपेठ भारताजवळ आहे. चीनबरोबर सहकार्य केल्यानंतर त्यात मोठा बदल घडू शकतो. हे सुचवून शहकाटशहाचे राजकारणही त्यातून दिसून येते. ज्या पद्धतीने अमेरिकेने भारताशी व्यवहार केला आहे. तो पाहता कोणत्याही परिस्थितीत भारताला वरचढ होऊ द्यायचे नाही. हादेखील अमेरिकेचा सुप्त हेतू स्पष्ट होतो. कारण रशियाबरोबर भारताने वाढवलेली मैत्री आणि कच्च्या तेलासारखा अत्यंत ज्वलंत प्रश्न सोडवण्यात भारताला मिळालेले यश हे अमेरिकेला सहन झालेले नाही. रशियाकडून अत्यंत स्वस्त दरात भारताने कच्चे तेल मिळवले परिणामी भारतातील इंधनाच्या किंमती नियंत्रित ठेवणे सहज शक्य झाले. अन्यथा आज पेट्रोल डिझेलसारख्या महत्त्वाच्या इंधनाचे दर दोनशे रूपये प्रतीलिटरच्यावर गेले असते. म्हणजे रशियाबरोबरची भारताने केलेली ही आर्थिक भागिदारी जशी यशस्वी ठरली त्याचप्रमाणे आता चीनबरोबर मोठी भागिदारी करून अमेरिकेला शह देण्याचीच ही चाल म्हणावी लागते. अर्थात सात वर्षापूर्वी मोदींनी चीनला भेट दिली होती. आणि या दोन देशातील वातावरण सुधारेल अशा प्रकारचे वातावरण निर्माण झाले होते. परंतु तसे झाले नाही उलट गलवान खोऱ्यांमध्ये चीनी सैनिकांकडून झालेले आक्रमण अरूणाचल प्रदेशावर दावा सांगण्याचा चीनचा प्रयत्न या सर्व गोष्टी भारताला बराच त्रास देणाऱ्या ठरल्या. अजूनही भारत चीन सीमेवर खूप सकारात्मक वातावरण आहे असे नाही. चीनकडून सीमावर्ती भागामध्ये वेगवेगळी बांधकामे सुरू आहेत. याशिवाय पाकिस्तान नेपाळ, म्यानमार, श्रीलंका या देशांबरोबरचे संबंध वाढवून भारताला सतत नजरेखाली ठेवण्याचा प्रयत्न चीनकडून होत आहे. अगदी सुरक्षा परिषदेतही भारताला विरोध करून पाकिस्तानची बाजू घेणाऱ्या चीनवर कितपत विश्वास ठेवायचा असाही प्रश्न अजूनही कायम राहातो.

### पेप्सीकोलाची नाकेबंदी

विशेषतः गेल्या पाच वर्षातील आंतरराष्ट्रीय स्तरावरच्या घडामोडी आणि अमेरिकेने सगळ्या जगालाच टेरिफच्या दहशतीखाली आणण्याचा केलेला प्रयत्न यातून खूप नवी आंतरराष्ट्रीय समिकरणे होऊ लागली आहेत. कारण भारतासारखा देश आर्थिकदृष्ट्या भक्कम झालेला आहे. १९९५ च्या काळात तो पोखरण येथे अणू चाचणी केल्यानंतर भारतावर अमेरिकेने आर्थिक निर्बंध लादले होते. त्यावेळी भारताची स्थिती खूपच नाजूक होती. तरीदेखील या आर्थिक निर्बंधांना सहन करीत भारताने आपली प्रगती कायम ठेवली. अखेरीस काही कालावधीनंतर अमेरिकेला हे आर्थिक निर्बंध मागे घ्यावे लागले त्यावेळची भारताची आर्थिक स्थिती आणि आताची आर्थिक स्थिती यामध्ये जमीन आसमानाचा फरक पडलेला आहे. त्याकाळात अनेक कारणांसाठी भारताला अमेरिकेवर अवलंबून राहावे लागत होते. आज परिस्थिती बदलली आहे. अमेरिकेतल्या अनेक संस्थांना भारताबरोबर केवळ सहकार्यच नव्हे तर पार्टनरशिप किंवा भागिदारी करण्याची इच्छा असते. अगदी अमेरिकेतली नासा ही संस्था आता भारताच्या इस्त्रोबरोबर अनेक प्रकल्पांबाबत भागिदारी केलेली आहे. अमेरिकेतल्या मोठ्या कंपन्यादेखील भारतात येण्यासाठी उत्सुक आहेत. आतापर्यंत पेप्सी कोला या कंपन्यांनी भारतातून गडगंज नफा कमावला. मात्र आता टेरिफच्या बडग्यानंतर सर्वाधिक नफा कमावणाऱ्या या दोन कंपन्यांची नाकेबंदी करायला भारतानेही सुरूवात केलेली आहे. यासारख्या निर्णयांचेदेखील अमेरिकेत पडसाद उमटू लागले आहेत. म्हणजे एकीकडे रशिया चीनबरोबरचे संबंध वाढवत न्यायचे आणि दुसरीकडे काही अमेरिकन कंपन्यांच्या मुसक्या आवळायच्या असेही धोरण अवलंबले जात आहे. म्हणूनच अमेरिकेचे हे टेरिफ धोरण आंतरराष्ट्रीय समिकरणात बदलायला भाग पाडते आहे.